‘A’ Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमांसाठी चहा, नाश्ता व भोजन सुविधा पुरविण्यासाठी दरकराराची निविदा सूचना

कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात येत्या वर्षभरात होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी **‘चहा, नाश्ता व भोजन’** पुरविणेसाठी नोंदणीकृत पुरवठादारांकडून करार केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीसाठी निविदा मागविण्यात येत आहेत. सदरची निविदा सूचना ही विद्यापीठाच्या **Website: www.nmu.ac.in** संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सदरची परिपूर्ण भरलेली सिलबंद निविदा मा. कुलसचिव कार्यालयाचे कक्ष क्र. ४०९ मध्ये दि.०८/०२/२०२४ किंवा तत्पूर्वी सायं. ५.०० वाजेपर्यंत** जमा करावी. सदरची निविदा सूचना सादर करण्यासाठी मुदतवाढ दिल्यास अथवा शुध्दीपत्रक निर्गमित केल्यास त्या संबंधीची सूचना वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

जाक्रं: कबचौउमवि/२/कुलसचिव/निविदा/०३/२०२४ **(डॉ. विनोद प्र. पाटील)**
दिनांक : १८/०१/२०२४ **कुलसचिव**

||अंतरी पेटवू ज्ञानज्योत||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. 80, उमविनगर, जळगाव-425001

## विद्यापीठात वर्षभरात आयोजित विविध कार्यक्रमांसाठी चहा, नाश्ता व भोजन सुविधा पुरविण्यासाठी दरकराराची निविदा.

( कराराचा कालवधी : करार केल्याच्या दिनांकापासून एक वर्षापर्यंत.)

संदर्भ: कबचौउमवि/कुलसचिव कार्यालय /2/निविदा/ 03/2024, दि.18/01/2024

संपर्क

निविदा माहितीपत्रकासह डाऊनलोड करण्यासाठी www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेली आहे.

( निविदेची एकूण पाने :- ०१ ते २० )

(वित्तीय निविदा एकुण पाने :- ०१ ते ०३ )

**निविदेची किंमत रु. 3,000/-**

# ◘ अनुक्रमणिका ◘

## चहा, नाश्ता व भोजन सुविधा पुरविण्यासाठी दर कराराची निविदा


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1. | निविदेविषयक वेळापत्रक आणि संपर्क तपशिल | 2 |
| 2. | निविदा सुचना जाहिरात | 3 |
| 3. | निविदा भरणेसंदर्भातील सूचना | 4 ते 6 |
| 4. | निविदेसंबंधीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती | 7 ते 10 |
| 5. | प्रपत्र - 1 | 11 |
| 6. | प्रपत्र - 2 | 12 |
| 7. | प्रपत्र - 3 | 13 ते-14 |
| 8. | प्रपत्र - 4 | 15 |
| 9. | प्रपत्र - 5 | 16 |
| 10. | प्रपत्र - 6 | 17 |
| 11. | शिफारस पत्र | 18 |
| 12. | चहा,नाश्ता व भोजनासंबंधी मेनूचा तपशिल | 19 ते 20 |
| | | |
| 13 | वित्तीय निविदा (स्वतंत्र लिफाफा सादर करावा Price Bid) | 1 ते 3 |

## निविदा वेळापत्रक आणि संपर्क तपशिल

**विद्यापीठात वर्षभरात आयोजित होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी चहा, नाश्ता व भोजन सुविधा पुरविण्यासाठी दर करारासाठीची निविदा सूचना**

कराराचा कालावधी : करार केल्याच्या दिनांकापासून एक वर्षापर्यंत.

| अ.क्र. | निविदेसंबंधित प्रमुख तारखा | सुरुवात दिनांक आणि वेळ | अंतिमं दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|
| 01 | निविदा प्रसिध्दी | 18/01/2024 | - |
| 02 | निविदा कागदपत्रे सादरीकरण | 19/01/2024 | 08/02/2024 |
| 03 | तांत्रिक बीड उघडण्याची तारीख | 09/02/2024 | -- |
| 04 | पात्र निविदा धारकांची आर्थिक बीड उघडण्याची तारीख | 13/02/2024 (तांत्रिक भाग तपासणीनंतर शक्य झाल्यास) | -- |
| 05 | निविदा कागदपत्रे उघडण्याचे ठिकाण | मुख्य प्रशासकीय इमारतील कक्ष क्र. 409 मा. कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव | |
| 06 | पात्र निविदाधारकांना वाटाघाटीसाठी बोलविण्याची तारीख | 15/02/2024 (शक्य झाल्यास) | - |

## निविदा विषयक चौकशीसाठी संपर्क क्रमांक

1) **श्री वाल्मीक पाटील, सहायक** : **0257-2257267**
   कबचौउमवि,जळगाव : 9423487011

2) **कुलसचिव कार्यालस** : 0257-2257215/216

3) **वित्त ( खरेदी ) विभाग** : 0257-2257236/237
   कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (फक्त निविदे विषयक माहितीसाठी)

||अंतरी पेटवू ज्ञानज्योत||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

उमविनगर, जळगाव-425001

**विद्यापीठात वर्षभरात आयोजित होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी चहा, नाश्ता व भोजन सुविधा पुरविण्यासाठी दर करारासाठीची निविदा सूचना**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात वर्षभरात आयोजित होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी करार केल्यापासून एक वर्षाच्या कालावधीकरिता चहा, नाश्ता व भोजन पुरविणेसाठी करावयाच्या दरकरारासाठी नोंदणीकृत पुरवठादारांकडून सिलंबदरित्या निविदा मागविण्यात येत आहेत.

तरी निविदा माहितीपत्रक (तांत्रिक लिफाफा) व BOQ (दराचा लिफाफा) विद्यापीठाचे संकेतस्थळ www.nmu.ac.in या संकेतस्थळावर निविदा क्रमांक-कबचौउमवि/कुलसचिव कार्यालय/2/निविदा/03 /2024, दि.18.01.2024 या अन्वये उपलब्ध करून दिलेली आहे. निविदाधारकांशी निगडीत तांत्रिक लिफाफा (Tehnical Bid) परिपूर्ण असल्यावरच दरांचा लिफाफा (Price Bid) उघडण्यात येईल.

टीप : 1) निविदा डाऊनलोड व सादर करण्याचा कालावधी दि.19/01/2024 ते दि.08/02/2024, वेळ: संध्या. 05.40 वाजेपर्यंत आहे.

2) तांत्रिक लिफाफा उघडण्याची दि.09/02/2024

स्थळ : मुख्य प्रशासकीय इमारतील कक्ष क्र.409,मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

जा.क्र. : कबचौउमवि/कुलसचिव कार्यालय/2/निविदा/03/2024

दिनांक : 18/01/2024

**( डॉ. विनोद प्र.पाटील )**

**कुलसचिव**

# निविदा भरण्यासंदर्भातील सर्वसाधारण सूचना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे वर्षभरात आयोजित विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमासाठी सहभागी विद्यार्थी, मान्यवर, समिती सदस्य व इतर उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या **चहा, नाश्ता व भोजनाची** व्यवस्था विद्यापीठ परिसरात करावयाची आहे. त्याअनुषंगाने प्रतिथयश व नोंदणीकृत चहा, नाश्ता व भोजन पुरवठादार यांचेशी कार्यक्रमापूर्वी दर करार करणेबाबत निश्चित केलेल्या मेनुसाठी निविदेत नमूद खालील निर्देशित अटी व शर्तीनुसार निविदा मागविण्यात येत आहे. निविदा भरण्यासंदर्भातील सूचना खालीलप्रमाणे :-

1) कोऱ्या निविदा, अटी व शर्तीसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.nmu.ac.in डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहेत.

निविदाधारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवजे फक्त ऑफलाईन पध्दतीने सादर करणे अनिवार्य राहील. तसेच निविदा किंमत व बयाणा रक्कम **बँक ऑफ महाराष्ट्र,बांभोरी शाखा खाता नं. 60431102620** IFSC Code - **MAHB0001422** या खाते क्रमांकावर ऑनलाईन भरावी लागेल, त्यासाठी खालील link अथवा QR Code करून भरणा करता येईल, अन्यथा निविदा प्रक्रीयेत सहभागी होता येणार नाही. भरणा झाल्याची प्रत निविदेसोबत जोडण्यात यावी.

https://edu.easebuzz.in/register/NorthkG6e3/Tender_Fees_EMD

2) राज्य व राष्ट्रीय सुक्ष्म व लघु मध्यम, उद्योगाचे नोंदणीकृत पुरवठादारांनी (NSIC, MSME Registered Supplier) देखील निविदा शुल्क (Tender Fee) व बयाणा रक्कम (Earenst Money Deposit) भरणे अनिवार्य राहिल.

3) निविदेत नमूद केलेल्या पात्रतेच्या निकषानुसार लिफाफा क्र.1 मध्ये (प्रपत्र- 1 ते 7 शी निगडीत निविदेचे तांत्रिक भागातील कागदपत्रे स्वस्वाक्षांकीत करून)A-4 साईजच्या मोठ्या पाकीटात सर्व तांत्रिक बाबींशी निगडीत कागदपत्रे सिलबंदरित्या सादर करणे अनिवार्य आहे. त्यासोबतच वित्तीय दरांचा भाग प्रपत्र-8 (Price Bid) हे परिपुर्णरित्या भरुन लहान आकाराच्या पाकीटात सिलबंदरित्या सादर करावे.

पाकीटाच्या दर्शनी भागावर "**चहा, नाश्ता व भोजनासाठी दर कराराची निविदा** " असा स्पष्ट व मोठ्या अक्षरात उल्लेख करणे आवश्यक आहे.

ज्या निविदाधारकांनी तांत्रिक भागातील संपुर्ण कागदपत्रे सादर केलेली नाहीत त्यांच्या वित्तीय दरांची निविदा प्रपत्र-8 (Price Bid) उघडण्यात येणार नाही.

4) बयाणा रक्कम व निविदा किंमत: ठेकेदाराने निविदा भरतांना निविदा किंमत रु.3,000/- (अक्षरी तीन हजार मात्र) व बयाणा रक्कम रु.10,000/-(अक्षरी रुपये दहा हजार मात्र) ऑनलाईन (Net Banking) व्दारे भरावयाची आहे. निविदेसोबत सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेल्या परवान्याची साक्षांकीत केलेली सत्यप्रतजोडणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने त्यास ओळखणाऱ्या दोन व्यक्तींचे हमीपत्र निविदे सोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे जोडावे.

5) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे आयोजित कार्यक्रमाकरिता चहा,नाश्ता व भोजनासाठी एका वेळेस किमान 51 व कमाल 2000 व्यक्तींकरिता (आवश्यकते प्रमाणे) ऑफलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

6) चहा, नाश्ता व भोजनाची निविदा मंजूर करणे, त्यामधील अटी व शर्तीमध्ये वाढ करणे किंवा शिथील करणे, निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे तसेच निविदा प्रक्रीयेत बदल करणे, अंशत: बदल करणे, अथवा संपूर्ण निविदा प्रक्रीया रद्द करणे व इतर बाबतचे संपूर्ण हक्क व निर्णय विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

7) निविदा सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहिल. ई-मेल, फॅक्स इत्यादी द्वारे सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

8) पात्र ठेकेदारांना दरांबाबत आवश्यकता भासल्यास वाटाघाटीसाठी बोलविण्यात येईल त्याचवेळेस निविदेसोबत सिलबंद केलेल्या कागदपत्रांची तपासणी मुळ कागदपत्रांवरुन करण्यात येईल. त्यासाठी निविदाधारकांनी अशा वेळी मूळ कागदपत्रे सोबत ठेवावीत. तांत्रिक व व्यापारी लिफाफा वेळापत्रकानुसार शक्य झाल्यास त्याच दिवशी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या कक्ष क्र.409 मा.कुलसचिव कार्यालयात उघडण्यात येतील किंवा यात बदल झाल्यास तसे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पत्रक प्रसिध्द करण्यात येईल.

9) सदर प्रसिध्द निविदेच्या अनुषंगाने तीन ग्राह्य तांत्रिक लिफाफे/निविदा प्राप्त न झाल्यास पुन्हा निविदेस मुदतवाढ देण्यात येईल. प्राप्त निविदा संपूर्ण अथवा अंशत: नाकारणे किंवा पुन्हा मागविणे याबाबतचे सर्व अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेले आहेत.

10) काही अपरिहार्य कारणामुळे वरील ठिकाण वेळेत व दिनांकास निविदा उघडणे शक्य नसल्यास आणि निविदा प्रक्रिये बाबत होणा-या बदलाचा तपशील अगर तशी सूचना (शुध्दीपत्रक) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत निविदाधारकां सोबत स्वतंत्र पत्रव्यव्हार करण्यात येणार नाही व सर्व बदल निविदाधारकांवर बंधनकारक राहतील.

11) चहा, नाश्ता व भोजनाचा तपशिल निविदेतील प्रपत्र-8 मध्ये नमूद करण्यात आलेला आहे.

12) निविदा उघडतांना प्रथम लिफाफा क्र. 1 (तांत्रिक) उघडून त्यामध्ये आवश्यक कागदपत्रांची व अटी-शर्तीची पुर्तता केली असल्याची खातरजमा करण्यात येईल. त्यामध्ये त्रुटी आढळल्यास निविदाधारकाने दिलेला लिफाफा क्र.8 (Price-Bid) उघडण्यात येणार नाही व त्यांची निविदा रद्द समजण्यात येईल. तांत्रिक निविदे बाबत निविदाकारास व्यापारी लिफाफा उघडण्यापूर्वी कोणतेही आक्षेप या कार्यालयास नोंदविता येतील, मात्र व्यापारी लिफाफा (Price-Bid) उघडण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तांत्रिक लिफाफ्याच्या बाबतीत कोणताही आक्षेप नोंदविता येणार नाही.

13) निविदेतील विहीत नमुन्यात मागविलेली सर्व सुस्पष्ट व वाचनीय कागदपत्रे निविदेसोबत जोडणे आवश्यक आहेत. तसेच सदरची कागदपत्रे मुळ प्रतीत किंवा स्वाक्षांकित (Self Attested) केलेले असणे आवश्यक आहेत.

14) सदर निविदा ही तांत्रिक कारणामुळे किंवा इतर प्रशासकीय कारणास्तव निविदा प्रक्रिया ही कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवला आहे.

15) निविदाधारक निविदा प्रक्रियेतुन कोणत्याही टप्प्यावर माघार घेतल्यास त्यांची निविदा शुल्कासह बयाना रक्कम जमा करुन त्यांना काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेले आहेत.

16) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग दि. 1 डिसेंबर 2016 मधील तरतूद 4.4.1.1 अन्वये निविदाधारकाशी संबंधित जोखमीच्या स्वरुपात बयाणा रक्कम वापरण्यात येते. निविदाधारकाकडून निविदा प्रस्ताव मागे घेणे, प्रस्तावात फेरफार करणे, करारावर सही न करणे, प्रस्ताव स्वीकृतीनंतर सुरक्षा अनामत न भरणे, अन्य अटींची पूर्तता न करणे अशा जोखमीच्या बाबतीत पूर्तता न झाल्यास बयाणा रक्कम जप्त करण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राहील.

17) निविदाधारक फर्म/बचत गट/ सहकारी संस्थेच्या कार्यकाळ नोंदणी दिनांकापासून निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत किमान 6 (सहा) महिन्यांचा असावा. निविदाधारक फर्म/बचत गट/ सहकारी संस्था असल्यास व कार्यकाळ 2 वर्षापेक्षा जास्त असल्यास बचत गट/संस्थेची नोंदणी झाल्यापासून निविदा सादर करण्याच्या कालावधीपर्यंत मान्यताप्राप्त सनदी लेखापाल (C.A) यांचेद्वारा प्रमाणित मागील तीन आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल व ताळेबंद अहवाल (Audited Statements) किंवा 2 वर्षापेक्षा कमी कार्यकाळ असल्यास लागू असलेल्या आर्थिक वर्षातील लेखा परिक्षण अहवाल व प्रमाणित ताळेबंद अहवाल निविदेसोबत सादर करणे अनिवार्य आहे.

18) पोलीस अधिक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी दाखला सदर निविदे सोबत जोडणे आवश्यक राहील.

19) उपरोक्त अटी व शर्तीबाबत काही अडचणी असल्यास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दूरध्वनी क्रमांकावर किंवा प्रत्यक्ष संपर्क साधून अडचणींचे निवारण करुन घेता येईल. निविदा कार्यवाहीस्तव या कार्यालयाकडून ऑनलाईन सूचना प्रसिध्दी अन्वये बैठक, सभा बोलवण्यात आल्यास सदर बैठकीस किंवा निविदा उघडतेवेळी फक्त निविदाधारक त्यांचेद्वारा प्राधिकृत (संस्थेचे प्राधिकार पत्र व ओळखपत्रासह हजर असलेले) प्रतिनिधी यांनाच उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाईल. त्यासाठी कोणताही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

20) सदर कामाचे स्वरूप, निविदा अटी शर्ती इत्यादीची माहिती निविदा पत्रकात उपलब्ध आहे. परिपूर्ण भरलेल्या निविदा, निविदा सूचनेत दिलेल्या निर्देशानुसार सादर करण्यात याव्यात.निविदेसंबंधित मुदतवाढ, दुरुस्ती किंवा सूचीमधील बदल इत्यादी बाबी वृत्तपत्रात जाहीर केली जाणार नसून त्याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरच प्रसिध्द करण्यात येईल.

21) अ) निविदेच्या प्रत्येक पानावर निविदाधारकाचे निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संमतीदर्शक संपूर्ण सही व शिक्का (Tender Full Set)असणे आवश्यक आहे. कुठल्याही प्रकारची खाडाखोड, ओव्हर रायटींग आढळल्यास निविदा अपात्र समजण्यात येईल.

ब) निविदे सोबत अधिकृत सांक्षाकित दस्तऐवजांच्या प्रती जोडाव्यात, अपूर्ण दस्तऐवज असलेली निविदा नाकारली जाईल.

क) निविदेत नमूद केलेल्या दस्ताऐवजां व्यतिरिक्त इतर काही दस्तऐवज मागणी केल्यास ते देखील सादर करणे निविदा धारकास बंधनकारक राहील.

फ) जी व्यक्ती अज्ञान आहे किंवा जी व्यक्ती दिवाळखोर म्हणून जाहीर झालेली आहे. किंवा भारतीय दंड विधान कायद्याअंतर्गत एखाद्या गुन्ह्यात न्यायालयाने दोषी जाहीर केलेली असेल किंवा अशा प्रकारच्या गुन्ह्यामध्ये ती व्यक्ती नैतीक मुल्य भ्रष्ट करण्याकामी समाविष्ट असेल किंवा जी व्यक्ती गुन्हेगारी स्वरूपाच्या कामात समाविष्ट असेल किंवा काही काळा पुरती प्रतिबंधक कायद्याखाली स्थानबध्द केलेली असेल किंवा केंद्र शासन, राज्य शासन, किंवा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांनी त्या व्यक्तीस/संस्थेस काळ्या यादीत टाकलेले असेल अशी व्यक्ती/संस्था निविदा भरण्यास अपात्र समजण्यात येईल. अशा व्यक्तीने अथवा संस्थेने जर निविदा सादर केली तर ती रद्द समजण्यात येईल.

ह) प्रत्येक पानावर निविदा धारकाद्वारा स्वाक्षरीकृत निविदा विषयक दस्तऐवजांचा पूर्ण संच ठेकेदाराने सादर करणे आवश्यक राहील.

**(डॉ. विनोद प्र. पाटील )**
**कुलसचिव,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# निविदा संबंधीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

1. निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर निविदाधारकास बयाणा रक्कम NEFT/RTGS ने परत करण्यात येईल अशी रक्कम परत करण्यास उशीर झाल्यास निविदाधारकास कोणत्याही प्रकारचे व्याज मागण्याचा अधिकार राहणार नाही.
2. ज्या ठेकेदाराची निविदा स्विकृत केली जाईल. त्यास कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर 07 (सात) दिवसांच्या आत सुरक्षा अनामत (Security Deposit) म्हणुन रू.50,000/- (रू. पन्नास हजार मात्र) इतकी रक्कम जमा करावी लागेल.कराराचा कालावधी संपल्यानंतर सुरक्षा रक्कम (बिनाव्याजी) परत दिली जाईल.
3. निविदा स्विकृत केलेल्या ठेकेदारास अटी व शर्तीचा करारनामा नियमानुसार देय असलेल्या रु.200/-च्या स्टॅम्पवर करून द्यावा लागेल.
4. ठेका दुसऱ्यास हस्तांतरीत करता येणार नाही अथवा पोट-ठेकेदार नेमता येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
5. ठेकेदाराची आणि नोकरवर्गाची वागणूक सहकार्याची आणि सौजन्यपूर्ण असली पाहिजे.
6. काम करतांना एखाद्या कामगारास इजा किंवा दुखापत झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही ठेकेदाराची राहील.
7. कार्यक्रमाच्यावेळी इमारतीचे व फर्निचरचे तसेच कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास नुकसान हे संबंधीत ठेकेदाराकडून वसूल केले जाईल.
8. कार्यक्रमाच्यावेळी भोजनाच्या ठिकाणी भोजन समिती सदस्य तसेच विद्यापीठातील सर्वोच्च अधिकारी केव्हाही भेट देतील व खाद्य पदार्थांची प्रतवारी तपासतील. खाद्य पदार्थाची प्रतवारी कमी दर्जाची असल्यास कंत्राट रद्द करण्याचा सर्व अधिकार विद्यापीठास राहिल.
9. ठेकेदाराने त्याच्या सर्व कर्मचा-यांच्या बाबतीत तसेच ठेका बाबत संपूर्ण कामगार कायदे,स्थायी आदेशांचे वेळोवेळी पालन करणे बंधनकारक राहील.
10. ठेकेदाराने कार्यक्रमाच्या ठिकाणी कोणाशीही वादविवाद न करता संबंधितांबाबत तक्रार असल्यास भोजन समिती सदस्यांशी त्वरीत संपर्क करावा.
11. कार्यक्रमामध्ये चहा, नाश्ता किंवा जेवण करीत असतांना जर ताटामध्ये काही अनपेक्षीतपणे किडे,अळी, झुरळ इ. निघाले आणि त्याबाबतची तक्रार संबंधितांनी केली तर याबाबत चौकशी केल्यानंतर त्वरीत भोजन समिती मा.कुलसचिव यांना अहवाल सादर करेल, नंतर मा. कुलसचिव हे चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करतील, गरज भासल्यास महाराष्ट्र शासनाचे, अन्न व औषध विभागातील अधिकारी यांचेशी संपर्क करुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.
12. वरील पैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास त्या संदर्भात ठेकेदाराचे म्हणणे ऐकूण घेवून सदर ठेका रद्द करण्याचा सर्व अधिकार विद्यापीठाच्या वतीने मा.कुलसचिव यांना राहील.
13. पुरवठादारास भोजनाची व्यवस्था विद्यापीठ परिसरात आवश्यकतेनुसार एकापेक्षा जास्त स्टॉल लावणे बंधनकारक राहिल.
14. कार्यक्रमात उरलेले अन्न, खरकटे आणि इतर अनावश्यक वाया जाणारे पदार्थांची विद्यापीठातील वसतीगृहांमधील जैविक कचरा मशिनमध्ये विल्हेवाट लावणे ठेकेदारास बंधनकारक राहील.
15. चहा, नाश्ता व भोजनाचा परिसर दैनंदिन स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. अस्वच्छता आढळून आल्यास कारवाई करुन दंड आकारण्यात येईल.
16. स्वयंपाकाकरीता लागणारी भांडी तसेच या व्यतिरिक्त इतर साहित्य (गॅस यंत्रणा इ.) आणि नोकर वर्ग यांची व्यवस्था भोजन पुरवठादाराने स्वत: करावी पुरवठादारास कोणत्याही इमारतीचा वापर करता येणार नाही. (उदा.स्वयंपाक करणा-या कर्मचा-यांची निवासाची व्यवस्था) पुरवठादाराच्या कोणत्याही वैयक्तिक अटी शर्ती असलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही, तसेच भोजन पुरवितांना स्वयंपाकासाठी निरोगी टापटीप कर्मचारी नेमावे लागतील व स्वच्छतेची काळजी घ्यावी लागेल. चहा, नाश्ता व भोजन तयार करणाऱ्या, वितरीत करणाऱ्या आणि त्या कामी मदत करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराचीच राहिल. या बाबत विद्यापीठाचे कोणतेही उत्तरदायित्व राहणार नाही. तसेच कार्यक्रमासाठी चहा,नाश्ता व भोजन तयार करण्याकरीता घरगुती गॅस सिलेंडर्सचा वापर न करता निविदाधारकाने व्यावसायिक गॅस सिलेंडर्सचाच वापर करावा व बाल कामगार नेमता येणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत मंजुर दरामध्ये वाढ केली जाणार नाही. तसेच निविदेच्या दराबाबत आवश्यकता वाटल्यास वाटाघाटी करण्याचा अधिकार संनियंत्रण समितीस राहिल.

17. ठेकेदाराने वेळेवर चहा, नाश्ता व भोजनाचा पुरवठा न केल्यास अशा प्रसंगासाठी ठेकेदारास् रुपये 25,000/- त्या दिवसासाठी दंड आकारण्यात येईल. अपरिहार्य कारणास्तव चहा, नाश्ता व भोजनाची व्यवस्था पुरवठादारास करणे शक्य नसल्यास विद्यापीठाने पर्यायी व्यवस्था केल्यास त्यासाठी मंजुर दरापेक्षा लागणारा जादा खर्च ठेकेदारांकडून वसुल करण्यात येईल.
18. निविदाधारकास चहा,नाश्ता व भोजन ठेका मंजुर झाल्यास त्यांनी चांगल्या प्रतिचे चहा, नास्ता व भोजन देणे बंधनकारक राहील. परंतु चहा, नाश्ता व भोजनातुन विषबाधा सारखे काही प्रकार घडल्यास त्यांच्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. व त्यांची सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधरकांची राहील.
19. विद्यापीठाचे हित लक्षात घेऊन सदर निविदेतील एखादी किंवा अधिक अटी शिथिल करण्याचा व अर्थ लावण्याचा तसेच कोणतीही निविदा पुर्णत: अथवा अंशत: मंजुर करण्याचा तसेच एखादी अगर सर्व निविदा कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचा संपुर्ण अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.
20. ठेकेदाराने भोजन ठेका अचानक बंद केल्यास अथवा नियमित व वेळेवर पुरवठा न केल्यास तसेच निकृष्ठ दर्जाचा पुरवठा केल्यास त्यांचा ठेका रद्द करुन सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल. तसेच त्यांच्या फर्मचे नावे विद्यापीठाच्या काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल.
21. कार्यक्रमासाठी वापरण्यात येणाऱ्या गॅस यंत्रणेच्या सुरक्षितेची संपुर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच स्वयंपाकाच्या ठिकाणी दुर्घटना घडल्यास होणाऱ्या संभाव्य नुकसानाची जबाबदारी सुध्दा ठेकेदाराची राहील. -
22. करारनामा करतांना वाढीव अटी व शर्तीचा अंतर्भाव करण्याचा अधिकार विद्यापीठाच्या वतीने मा.कुलसचिव यांनी राखून ठेवला आहे.
23. चहा, नाश्ता व भोजन पुरवठयाकामी वापरण्यात येणारे दूध, अन्नधान्य-किराणा माल, भाजीपाला, तसेच तयार केलेले अन्नपदार्थ यांचे दर्जाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास अन्न व औषध प्रशासन विभागाकडून मालाचा दर्जा तपासण्यात येईल. भोजन पदार्थ तपासणीचा सर्व खर्च नियमानूसार पुरवठाधारक यांनी करणे बंधनकारक राहील. त्याअन्वये भोजन पदार्थाचे दर्जाबाबत तपासणीअंती तक्रारीबाबत तथ्य आढळून आल्यास संबंधीतावर प्रचलित कायद्यातील तरतूदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल व पुरवठा आदेश तत्काळ रद्द करुन काळया यादीत समावेश करण्यात येईल.
24. चहा, नाश्ता व भोजन पुरवठा कालावधीत पुरवठा करण्यात आलेल्या चहा, नाश्ता व भोजनातून शिळे, निकृष्ट किंवा भेसळजन्य, अपायकारक अन्नपदार्थाचे सेवन केल्याने,भोजनव्यवसथेतील अस्वच्छता वा इतर बाबतीत निष्काळजीपणामुळे विषबाधा किंवा कोणत्याही प्रकारचा शारीरिक त्रास झाल्यास संबंधीत भोजन ठेका धारकास जबाबदार धरण्यात येऊन त्यांच्यावर नियमानुसार दंडात्मक अगर फौजदारीपात्र कायदेशीर कारवाई प्रस्तावित केली जाईल, अन्न सुरक्षा मानके कायदा 2006 अंतर्गत नियम व नियमन 2011 नुसार अन्न सुरक्षा व्यवस्थापन व त्याअंतर्गत उत्तम आचरण प्रणाली संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासन,विभाग जळगाव यांचेकडून पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन विद्यापीठ कार्यालयास (कार्यादेश स्वीकृतीनंतर 07 दिवसांच्या आत) सादर करण्याची जंबाबदारी मंजूर पुरवठा धारकांची राहील. या संबंधी सर्व खर्च पुरवठाधारक यांनी करणे बंधनकारक आहे.
25. मंजूर पुरवठाधारकानेच व संस्था /बचत गट असल्यास अध्यक्ष-सचिव तथा अधिकृत सभासदांनीच चहा, नाश्ता व भोजन ठेका चालविण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणे अनिवार्य आहे. शासनाच्या धोरणान्वये महिला सक्षमीकरण, सहकार चळवळ वृध्दींगत करणे या उद्देशाने महिला बचत गट व सहकारी संस्थांच्या माध्यमातून व्यवसायास उद्युक्त करण्यात येत असल्याने बचत गट/संस्थेच्या अधिकृत सदस्यांनी कार्यकुशलता दर्शवून स्वत:भोजन ठेका चालविणे अभिप्रेत आहे. त्यामुळे मंजूर पुरवठाधारक व्यक्ती/ संस्थेचे-बचत गटाचे सदस्य हे स्वत: उपस्थित न राहता त्यांनी अन्य दुय्यम यंत्रणा/ सहठेकेदार किंवा प्रतिनिधी नेमल्याचे आढळून आल्यास सदरचा पुरवठा आदेश तत्काळ रद्द करुन पुरवठाधारकास काळया यादीत समाविष्ट करण्याची कारवाई करण्यात येईल.
26. विवाद (Disputes) व कार्यक्षम (Jurisdiction) :- सदर चहा, नाश्ता व भोजन ठेका ई-निविदेबाबत निविदाधारक व विद्यापीठ यांच्यात कुठल्याही स्वरुपाचा वाद निर्माण झाल्यास मा. कुलगुरु यांनी दिलेला निर्णय हा अंतिम व दोन्ही वादी तथा प्रतिवादी पक्षांवर बंधनकारक राहील. निविदा मंजूरीअंती प्रचलित शासन नियमावलीनूसार मंजूर पुरवठाधारक यांचेशी निविदेतील अटी-शर्तीच्या अनुपालनास्तव करार करण्यात येईल. या करारनाम्यामुळे व करारनाम्याअंतर्गत कुठल्याही प्रकारचा वादविवाद उद्‌भवल्यास तो जळगाव जिल्हा सत्र न्यायालय यांच्या कार्यकक्षेतच दाखल करता येईल.
27. ठेकेदारास उपरोक्त कामासाठी अथवा साहित्यापोटी अग्रीम रक्कम दिली जाणार नाही.
28. ठेकेदाराने भरलेली निविदा विद्यापीठाने स्विकारल्यास त्याबाबत ठेकेदारास पत्रान्वये लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

29. ठेकेदाराने पुरविलेले खाद्यपदार्थ भेसळयुक्त असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत ठेकेदार भेसळ प्रतिबंधक कायद्यामधील तरतूदीनुसार कारवाईस पात्र राहील.

30. कार्यक्रमाच्या ठिकाणी व परिसरात कोणत्याही साहित्याची नासधूस, मोडतोड, चोरी, अपहार इत्यादी प्रकारे झालेले नुकसान ठेकेदाराला भरुन द्यावे लागेल.

31. कार्यक्रमाच्या ठिकाणी किंवा परिसरात धुम्रपान,गुटखा,तंबाखुयुक्त पदार्थ, तसेच अल्कोहोलयुक्त पेय इत्यादींची विक्री किंवा सेवन करता येणार नाही.

32. ठेकेदाराला कार्यक्रमाच्या बाहेर डबा देता येणार नाही.

33. विद्यापीठाचे कर्मचारी / अधिकारी व प्राधिकरणांच्या कोणत्याही सदस्यास किंवा त्यांचे कुटूंबातील व्यक्तीस ठेका घेता येणार नाही.

34. नियमानुसार विविध करांची देय होणारी रक्कम देयकातुन / बिलातुन परस्पर वसुल करण्याचा अधिकार विद्यापीठास राहिल.

35. एका वेळेस उपयोगात येणाऱ्या प्लॅस्टीकचा (Single Use Plastic) वापर करू नये. तसेच कुठल्याही प्रकारचे प्रदुषण होणार नाही याची काळजी घ्यावी. तसे न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

36. सशर्त (Conditional) निविदा स्विकारली जाणार नाही.

37. चहा, नाश्ता व भोजनासोबत पुरवठादारास शुध्द आर. ओ. वॉटर उपलब्ध करून द्यावे लागेल.

38. चहा, नाश्ता व भोजनासाठी आवश्यक कप, डिश, ताट-वाटी, ग्लास इ. आवश्यक बफे साहित्य, टेबल, टेबलासाठी फ्रिल, वॉश बेसीन, सिल्व्हर फॉईल पेपर व अनुषंगीक साहित्य पुरवठादारास/ठेकेदारास उपलब्ध करून द्यावे लागेल. चहा व पिण्याच्या पाण्यासाठी स्टील किंवा कागदी ग्लासचा वापर करणे आवश्यक राहिल.

39. ज्या ठिकाणी चहा,नाश्ता व भोजनाचा कार्यक्रम असेल त्या ठिकाणी विद्यापीठाच्या पाण्याच्या सुविधेपासुन पाणी, इलेक्ट्रीक सुविधा प्राप्त करून घेण्याची जबाबदारी पुरवठादार/ठेकेदार यांची राहिल.

40. पुरवठादार/ठेकेदारास आवश्यक ते साहित्य/वस्तु ने-आण करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे भाडे/वाहतुकीचा खर्च/ मजुरांचा खर्च किंवा कोणताही खर्च विद्यापीठामार्फत वेगळा देण्यात येणार नाही.

41. स्वच्छतेच्या दृष्टीने कामगार/वाढपी यांना पोशाख व हॅण्डग्लोज असणे आवश्यक राहिल.

42. देयक सादर करताना विद्यापीठाचा GST no 27AAAJN0465A1ZL चा उल्लेख करून पक्के बील द्यावे लागेल. बीलातील GSTची रक्कम शासनाकडे भरणा केल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक राहिल. तद्नंतरच भोजन समितीसाठी वेळोवेळी नियुक्त केलेल्या मा.अध्यक्षांनी शिफारस केल्यानंतर देयकाची अदायगी 15 दिवसानंतर करण्यात येईल.बील/देयक सादर करताना बिलावर पुरवठादाराच्या फर्मचा GST Number व PAN क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.

43. भोजन तयार करताना उच्च दर्जाचे मसाले, धान्य तांदुळ (बासमती) व उच्च प्रतीचे खाद्य तेलाचा (सुर्यफुल व शुध्द तुप, डबल फिल्टर) व सॉस वापरणे आवश्यक आहे. भाजीपाला ताजा आणावा लागेल.

44. विद्यापीठाद्वारा दिलेल्या भोजन मेनुमध्ये, संख्येमध्ये बदल आणि रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहिल.तसेच पुरवठादारास/ठेकेदारास मेनु प्रमाणे चहा, नाश्ता व भोजन देणे बंधनकारक राहिल.

45. विद्यापीठाद्वारा पुरविलेल्या चहा, नाश्ता व भोजनाचे अधिकृत कुपन पुरवठादार/ठेकेदार यांनी बिलासोबत सादर करणे बंधनकारक राहिल, त्याशिवाय बिलाची/देयकाची अदायगी करण्यात येणार नाही.

46. उपरोक्त निविदेतील सर्व अटी व शर्ती मी/आम्ही काळजीपुर्वक वाचल्या असुन त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या अधिन राहून सदरची निविदा सादर करीत आहे अशा आशयाचे हमीपत्र देणे संबंधित पुरवठादार/ठेकदारावर बंधनकारक राहिल.

47. किमान दर धारक पुरवठादारास उपरोक्त सर्व अटी शर्तींच्या अधिन राहून पुरवठा आदेश दिला जाईल, तथापी काहीही कारणास्तव किमान दर धारक पुरवठादार कार्यदेशाची पुर्तता कोणत्याही वेळी करण्यास असमर्थ ठरल्यास तसे आढळून आल्यास विद्यापीठ द्वितीय किमान दर धारक यांना त्या कार्यक्रमासाठी किंवा पुढील कार्यक्रमासाठी आदेश देईल व किमान दर धारक (L-1) यांना द्वितीय किमान दर धारकांच्या (L-2) दरातील तफावतीची रक्कम भरून देणे बंधनकारक राहील.

48. करार केलेल्या कालावधीत पुरवठादाराने समाधानकारकरित्या चांगली सेवा दिलेली असल्यास, त्या पुढील एका वर्षाच्या कालावधीसाठी करार वाढविण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

49. ठेकेदाराची अनामत रक्कम ठेका संपल्यानंतर विद्यापीठाकडून **<u>"ना देय प्रमाणपत्र"</u>** सादर केल्यानंतरच परत केली जाईल.

50. सदरची निविदाच्या एका प्रतीवर निविदा धारकाने प्रत्येक पुरवठादार/संस्थेचा शिक्का व स्वत:ची स्वाक्षरी करून, यातील सर्व -अटी व शर्तीचे मी पालन करणार आहे, या बद्दल प्रपत्र-3 सोबत जोडून पाठविणे आवश्यक आहे.

**(डॉ. विनोद प्र. पाटील )**
**कुलसचिव,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

स्थळ : कबचौउमवि,जळगाव
दिनांक : 18/01/2024

विद्यापीठाद्वारा प्रसिध्द निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत निविदाधारकाची स्वाक्षरी.

स्वाक्षरी :______________________________

निविदा धारकाचे नांव :______________________________

शिक्का :______________________________



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ * जळगाव-425001 *

# <u>प्रपत्र - १</u>

**<u>निविदाधारकारकाचा वार्षिक उलाढाली बाबत सनदी लेखापालाचा (Chartered Accountant) दाखला</u>**

प्रमाणित करण्यात येते की, ______________________________ यांच्या खालील नमूद केलेल्या बँकांच्या खात्यातील तपशील आणि वार्षिक ताळेबंद आमच्या मार्फत तपासण्यात आलेला असून, त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी चहा, नाश्ता व भोजनाच्या केटरींग व्यवसायापोटीची वार्षिक उलाढालीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| **अ.क्र.** | **खातेदाराचे /निविदाकाराचे नांव** | **बँकेचे नांव / शाखा खातेदाराचा खाते क्रमांक** | **आर्थिक उलाढालीचे वर्ष** | **एकूण वार्षिक उलाढाल रक्कम** |
|---|---|---|---|---|
| | | | सन 2020-2021 | |
| | | | सन 2021-2022 | |
| | | | सन 2022-2023 | |
| | | | 3 वर्षांची सरासरी उलाढाल (Average Turn Over) | |

ठिकाण:
दिनांक: / /2024

सनदी लेखापालाची
स्वाक्षरी व शिक्का व संपर्क क्रमांक

**टिप: या ठिकाणी निविदा भरणारे निविदाधारकाचे नांव अपेक्षीत आहे.**

## प्रपत्र - 2

# पूर्व अर्हता मुल्यांकन परिक्षण नमुना

निविदा ज्यासाठी भरावयाची आहे ते नांव : विद्यापीठात वर्षभरात होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी चहा, नाश्ता व भोजन सुविधा पुरविण्यासाठी दरकरार.

निविदेचा क्रमांक : कबचौउमवि/2/निविदा/03/2024,
: दि.18/01/2024

निविदाकाराचे नांव व पत्ता : ----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------

| अ.क्र. | ज्या शासकीय /निमशासकीय संस्थेत भोजन ठेक्याचे काम केलेले आहे त्या संस्थेचे /कार्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता | पुराव्याकरीता पुरवठा आदेश व अनुभव दाखला जोडलेला आहेत काय ? होय / नाही |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

- सोबत पुराव्याचे पुरवठा आदेश व अनुभव दाखला दोन्हीही स्वसांक्षांकित प्रतीत सादर करणे बंधनकारक आहे.
- चहा, नाश्ता व भोजन इ. केटरींगच्या व्यवसाया बाबतचा पुरावा म्हणून दस्तऐवजे जोडावीत. इतर दस्तऐवज गृहीत धरले जाणार नाही.

दिनांक:- / /2024

निविदाकाराचे नांव व पत्ता
मोबाईल क्रमांक व सही

## प्रपत्र - 3

## भोजन पुरवठा निविदे करीता निविदाधारकाने द्यावयाचे हमीपत्र

मी श्री /श्रीमती ______________________________ पुर्व जाणीवतेने स्वखुशीने निविदा प्रक्रिये कामी विनाशर्त हमीपत्र लिहून देतो / देते की, या निविदा अर्जात नमुद केलेली माहिती माझे संपुर्ण माहितीनुसार खरी आहे. तसेच निविदा फार्म मधील नमुद सर्व अटी, शर्ती ह्या मी स्वत: वाचल्या असून त्या मला मान्य आहेत व सदरच्या अटी-शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यास मी बांधील आहे. तसेच वित्तीय अनुपलब्धता अथवा इतर अपरिहार्य कारणामुळे चहा, नाश्ता व भोजन पुरवठा देण्याची रक्कम अदा करण्यास उशिर झाल्यास त्यावर व्याज दिले जाणार नाही हे मला मान्य असून सदर बाबत मला न्यायालयात दाद मागता येणार नाही. चहा, नाश्ता व भोजन पुरवठा अथवा तदनुषंगिक व्यावसायिक सेवा पुरवठयाबाबत शासनाच्या कोणत्याही विभागाने, कार्यालयाने किंवा शासनाच्या अधिकृत महामंडळ,सार्वजनिक उपक्रम व इतर शासकीय संस्था यांच्याव्दारे मला / आम्हाला सदर निविदा कालावधीकरीता बंदी /मनाई/ निलंबन आदेशान्वये काळया यादीत (Not Black Listed) समाविष्ट केलेले नाही अथवा माझ्या / आमच्या विरुध्द न्यायालयीन प्रकरणी कायदेशीर कार्यवाही प्रस्तुत नाही.

सदर निविदा प्रक्रियेसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव येथील निविदेच्या अनुपालनास्तव नमुद केलेल्या उपरोक्त निविदेतील सर्व पान अ.क्र. **०१ ते २०** हया मी/आम्ही प्रत्यक्ष वाचल्या असून मला / आम्हाला विनाशर्त मान्य आहेत. याबाबत माझी / आमची कोणतीही तक्रार नाही. तसेच निविदेच्या दरांच्या भागात (BOQ-Price Bid) मध्ये नमुद केलेल्या दरात मी चहा, नाश्ता व भोजनाची निविदा स्विकारण्यास तयार आहे. त्या साठी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची मी/आम्ही पुर्तता केली असून ते कागदपत्रे ई-निविदेसोबत जोडली आहेत. नियमानुसार विहीत केलेली सुरक्षा अनामत 5% इतकी रक्कम भरण्यास तयार आहे/सक्षम आहे. निविदा प्रक्रियेकामी, आवश्यक कागदपत्रे मी / आम्ही सादर केली नसल्यास मला/आम्हाला अपात्र ठरवून निविदा प्रक्रियेतुन वगळयाचा संपूर्ण अधिकार विद्यापीठास आहे याची मला/ आम्हाला पूर्ण जाणीव आहे. सदर निविदा प्रक्रियेअंती माझी निविदा मंजुर झाल्यास वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत मी स्वखर्चाने रु.200/- च्या स्टॅम्प पेपरवर लेखी करारनामा करुन देण्यास मी विनाशर्त विनातक्रार तयार आहे.

तसेच निविदेच्या बाबतीत काही सूचना /आक्षेप / तक्रारी असल्यास व्यापारी लिफाफा (Price-Bid)उघडण्याच्या पुर्वी पर्यंत अशा सुचना / आक्षेप /तक्रारी या आपल्या कार्यालयात प्रत्यक्ष येऊन अथवा विद्यापीठ कार्यालयाच्या ई-मेल registrar@nmu.ac.in/ fao@nmu.ac.in वर सादर करण्याची देखील या व्दारे हमी देण्यात येत आहे.

मी / आम्ही निविदेसाठी सादर केलेले कागदपत्रे /प्रमाणपत्रे /अनुभवाचे दाखले आणि आर्थिक उलाढालीच्या संदर्भात दिलेले सनदी लेखापालाचे (Chartered Accountant) प्रमाणपत्र पूर्ण पणे खरे व बरोबर आहेत. तसेच त्यातील नोंदविलेली माहिती ही निविदा प्रक्रियेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर प्राप्त आक्षेप / तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी अंती अंशत: अथवा पूर्णत: खोटी तथा निविदा प्रक्रियेतून अपात्र घोषित करण्या कामी संदिग्ध व अपुर्णता असलेल्या दस्तऐवजांचा समावेश असल्याचे आढळून आल्यास माझेवर / माझ्या संस्थेवर शासनाचे नियमानुसार उचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच माझी बयाणा रक्कम (EMD) जप्त/जमा करण्यात येईल आणि मला / आम्हाला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव च्या निविदा प्रक्रिये करीता काळया यादीत प्रविष्ट करण्यात येईल याची मला पुर्ण जाणीव आहे.

निविदेत सादर केलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे व नोंदविलेली माहिती ही सत्य व पूर्णतः खरी असून त्यात कोणताही फेरफार करण्यात आलेला नाही. निविदा दस्ताऐवजात अपूर्ण, संदिग्ध किंवा जाणीवपूर्वक गैरउद्देशाने खोटी माहिती नमूद केल्याचे आढळल्यास निविदा प्रक्रियेतुन अपात्र घोषित केले जाण्यास व त्या अन्वये उचित कायदेशीर कारवाईस मी पात्र राहील. तसेच माझी बयाणा रक्कम (EMD) जप्त करुन आमच्या संस्थेस नोंदणीकृत पुरवठादारांच्या यादीतून काढून टाकून काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल, याची मला पूर्ण जाणीव असून मी / आम्ही कारवाईस पात्र राहील.

बालमजुरी, कामगार कायदे, लैंगिक पिळवणूक, मानवाधिकार, पर्यावरणाची हानी, शासनाची फसवणूक यासंदर्भातील प्रचलित कायद्यातील तरतूदींचे तसेच शासनाच्या नियमावलीचे आमच्याकडून काटेकोरपणे अनुपालन केले जात आहे. सदर बाबत माझ्यावर / आमच्यावर कुठल्याही स्वरुपाची फौजदारी अथवा शासन नियमावलीचे उल्लंघन प्रकरणी अन्य गंभीर स्वरुपाची कारवाई प्रस्तावित नाही किंवा न्यायप्रविष्ट नाही.

उपरोक्त प्रमाणे निविदेत मी पूर्णतः सत्य व अचूक माहिती नोंदविलेली असून निविदा अटी-शर्तीनूसार सर्व तरतूदी मला विनाशर्त विनातक्रार मान्य आहेत. त्यानुसार निविदेतील माहिती खोटी नोंदविल्याचे आढळल्यास निविदा अपात्र ठरण्यास व उचित कायदेशीर कारवाईस मी पात्र असेल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

निविदाकाराची स्वाक्षरी :- ________________

नांव :- ________________________________

पत्ता :-________________________________

________________________________

मोबाईल क्र. ________________________________

शिक्का :-________________________________

सोबत :- स्व स्वाक्षांकीत केलेली चहा, नाश्ता व भोजन पुरवठाबाबत दरकराराची मुळ निविदेची एक प्रत मी यातील सर्व अटी शर्ती बिना शर्त मान्य असल्याबद्दल जोडुन पाठवित आहे.

# प्रपत्र - 4

## निविदाकाराने दर मंजुरी संदर्भात द्यावयाचे संमतीपत्रक

श्री. ______________________

पत्ता :- ______________________

______________________

दिनांक: / /2024

प्रति,
मा.कुलसचिव,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव

**विषय:- निविदेसाठी विद्यापीठा मार्फत निश्चीत होणारे दर मान्य असल्या संदर्भात संमतीपत्रक सादर करणे बाबत.**

**महोदय,**

मी / आम्ही आपल्या विद्यापीठा मार्फत सन 2024 या वर्षातील निविदेव्दारे विद्यापीठात सन 2024 मध्ये आयोजित विविध कार्यक्रमासाठी चहा, नाश्ता व भोजन पुरविण्याकरिता प्रसिध्द झालेल्या निविदा क्रमांक कबचौउमवि/कुलसचिव कार्यालय/2/निविदा/03/2024,दि.18.01.2024 या निविदेसाठी निश्चीत केलेले दर अथवा विद्यापीठाने निश्चीत केलेले दर यास आमची संमती असून या संदर्भात कोणतीही हरकत नाही. निश्चीत केलेले दर मला / आम्हाला मान्य आहेत. करीता संमती पत्रक लिहून दिलेले आहे. त्या दराने मी / आम्ही निविदेत नमुद मेनु प्रमाणे चहा, नाश्ता व भोजनाचा पुरवठा करण्याचे काम करण्यास तयार आहेत.

कामात कोठेही, कसलीही उणीव/कमतरता/असमर्थता/असक्षमता आढळून आल्यास विद्यापीठ द्वितीय किमान दर धारकाकडून सदरचा कार्यक्रम अथवा पुढील कार्यक्रम करून देण्यास माझी संमती असुन, होणारे नुकसान मी भरून देण्यास बांधील आहे.

**निविदाकाराची स्वाक्षरी**
**निविदाकाराचे नांव व पत्ता**

सोबत :- मेनु पत्रके स्व-स्वाक्षांकीत करून सही शिक्क्यानिशी जोडावीत.
(निविदेतील पान क्र. 19 ते 20 ची प्रत या सोबत जोडावी)

# प्रपत्र - 5

## पात्रतेविषयक निविदेसोबत मुळ प्रति अपलोड करावयाच्या दस्तऐवजांची यादी

**(लिफाफा क्र.1 तांत्रिक निविदा मध्ये जोडावा)**

| तपशिल | कागदपत्रे सादर केली आहेत किंवा कसे ? होय / नाही |
|---|---|
| निविदाधारकाचे संपूर्ण नांव | |
| निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता | |
| | |
| दुरध्वनी क्रमांक | कार्यालय :- |
| | कंपनी :- |
| | मोबाईल क्रमांक :- |
| ई- मेल आय.डी. | |
| बयाणा शुल्क रक्कम | |
| निविदा शुल्क रक्कम | |
| पॅन कार्ड क्र. (PAN Card) | |
| वस्तु व सेवा कर अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र (GST नोंदणी ) | |
| संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये अथवा ग्रामपंचायत ) | |
| संस्था नोंदणी अधिनियम 1950 किंवा 1860 (बचत गट नोंदणी सक्षम प्राधिकारी प्रमाणपत्र सुट लागू असल्यास) | |
| Udyog Aadhaar चे नोंदणी प्रमाणपत्र | |
| अन्न व औषध प्रशासन यांचेकडील वैध नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक वैधता दिनांक कालावधी पासुन-पर्यंत | |
| सनदी लेखापालाचे उलाढाल संदर्भातील प्रमाणपत्र (प्रपत्र -1) किमान उलाढाल रू.10 लक्ष जास्त असावी | |
| संबंधित उत्पादकाचे प्राधिकार पत्र (लागू असल्यास) | |
| आयकर भरणा विवरणपत्र (आर्थिक वर्ष 2020-2021, 2021-2022 व 2022-2023) | |
| संस्था / बचत गटाच्या नांवे असलेले बँक खात्याचे पास बुक प्रत जोडली आहे काय ? | |
| सरकारी /निमसरकारी/नामांकित खाजगी संस्थांमार्फत निर्गमित अनुभवाचे प्रमाणपत्र ( प्रपत्र - 2) | |
| निविदाकाराने प्रपत्र - 3 अन्वये सादर करावयाचे हमीपत्र | |
| दर मान्य असल्या संदर्भात संमतीपत्रक (प्रपत्र - 4) | |
| अधिकृत प्रतिनिधीसाठीचे प्राधिकार पत्र (प्रपत्र - 6) | |
| **सदरचे प्रपत्र निविदा सोबत स्वाक्षरीने प्रमाणीत करुन सादर करणे बंधनकारक राहील.** | |

<u>टिप</u>:- १) जोडलेल्या दस्तऐवजांसाठी (✓) अशी खुण करावी. २) ठेकेदाराने या निविदेसोबत वरील कागदपत्रांच्या छायांकित सांक्षाकित प्रति जोडाव्यात. ३) या कागद पत्रांच्या मुळ प्रती निविदा उघडण्याच्या वेळी / तपासणीच्या वेळी विद्यापीठास उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

**निविदाकाराची स्वाक्षरी / नांव व शिक्का**



उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव-425001

**प्रपत्र - 6**

**(निविदाधारकाकडून प्राधिकृत प्रतिनिधीस निविदा कार्यवाहीस्तव दिलेले प्राधिकार पत्र)**

दिनांक: /01/2024

प्रति,
**मा.कुलसचिव,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव

**विषयः- चहा, नाश्ता व भोजन पुरवठा करण्यासाठी दर पत्रकांची निविदा कार्यवाहीस्तव निविदाधारक यांचे वतीने प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून प्राधिकार पत्र सादर करणेबाबतः**

महोदय,

आम्ही ________________________________आपल्या विद्यापीठातर्फे वर्षभरात आयोजित केल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी चहा, नाश्ता व भोजनाचा पुरवठा करण्यासाठी प्रसिध्द केलेल्या निविदा क्रमांक कबचौउमवि/२ / निविदा/०३/२०२४, दि.१८.०१.२०२४ साठी श्री./श्रीमती. ________________________ यांना निविदा प्रक्रियेत भाग घेणे, निविदा कार्यवाहीसंबंधीच्या बैठकीस उपस्थित राहणे, निविदा दरात वाटाघाटी करुन संमती पत्र भरुन सादर करणे याकामी सर्व संमतीने अधिकार प्रदान करुन सदर प्राधिकार पत्रान्वये निविदा कार्यवाहीस्तव प्राधिकृत करीत आहोत.

आपला विश्वासू,

प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नांव,पत्ता व स्वाक्षरी

निविदाकाराची स्वाक्षरी, नांव-पत्ता व शिक्का

(सूचनाः- प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीने निविदा कार्यवाही दरम्यान विहीत नमुन्यातील मूळ प्राधिकारपत्र व स्वतःचे ओळखपत्र (पॅनकार्ड / मतदानकार्ड /बँक पासबुक /वाहन चालविण्याचा परवाना /जेष्ठ नागरिक कार्ड किंवा अन्य) दाखविणे अनिवार्य आहे.)

# शिफारसपत्र

दि.  /  /2024

श्री./श्रीमती/सौ. ____________________________________________ यांचा चहा, नाश्ता व भोजन पुरविण्याचा परवाना (मेस-परमीट) क्र.________________हा असुन त्यांना मी स्वतः गेल्या __________ वर्षापासुन चांगल्या प्रकारे ओळखतो. त्यांना चहा, नाश्ता व भोजनाचा पुरवठा करण्यासाठी चांगला दर्जा राखला असल्याची माझी अनुभवाअंती धारणा झाली आहे.

आपला विश्वासु

( ________________________ )

**ओळख देणाराचे नाव व सही**

( किमान 2 प्रतिष्ठीत व्यक्तींचे शिफारसपत्र सादर करावे.)

**नाश्ता साठी मेनु :-**

| अ. क्र. | मेनु |
|---|---|
| A | इडली सांबार / मेदुवडा सांबार, |
| B | पोहे / उपमा / भजी, |
| C | आलु पराठा / पराठा व दही, |
| D | दही मिसळ / रस्सा वडा / रस्सा पोहे, |
| E | वडापाव / कचोरी /समोसा/ पाववडा/ सॅण्डविच |
| F | खमण ढोकला, |
| G | दालपकवान |
| H | साधी भजी/ मुंग भजी |
| I | साबुदाणा खिचडी/ उपवास चिवडा/ वेफर्स, |

**नगाप्रमाणे पुरविण्याच्या पदार्थाचा तपशील :-**

| अ. क्र. | मेनू |
|---|---|
| १ | चहा |
| २ | कॉफी / दुध |
| ३ | केळी |
| ४ | अंडी |
| ५ | आईस्क्रिम Amul/Dinshaw |
| ६ | शरबत |
| ७ | सुप |
| ८ | कैरीचे पन्हे |
| ९ | मठठा / मसाला ताक |
| १० | बिस्कीट |

**भोजनासाठी मेनु:-**

| अ. क्र. | मेनू |
|---|---|
| A | **पातळ भाजी :-** छोले / मटकी / चवळी, मिक्स व्हेज / पालक पनीर /<br>**सुकी भाजी :-** बटाटा भाजी / मिक्स भाजी<br>दाल फ्राय, जिरा राईस/ स्टीम राईस,<br>**गोड पदार्थ :-** गाजर हलवा/ काजु कतली / अंगुरी रसमलाई / आंब्याचा रस /<br>चपाती / फुलके / पराठा / साधी पुरी / मसाला पुरी<br>साधी भजी / मुंग भजी, |
| B | **पातळ भाजी** :- पनीर मसाला / काजु पनीर / कोफ्ता करी,<br>**सुकी भाजी :-** लसुनी मेथी / मिक्स व्हेज / व्हेज कोल्हापुरी,<br>दाल तडका, जिरा राईस/ स्टीम राईस,<br>**गोड पदार्थ :-** गुलाब जाम / बालुशाही / काला जाम / अंगुरी रसमलाई / दिलजानी,<br>चपाती / फुलके / पराठा / साधी पुरी / मसाला पुरी,<br>साधी भजी / मुंग भजी, |
| C | **सुकी भाजी** :- कोबी बटाटे /भेंडी मसाला / बेंगन मसाला,<br>**पातळ भाजी :-** आलु मटर,/ छोले<br>व्हेज पुलाव / मसाला भात/साधा भात, दाळ<br>**गोड पदार्थ :-** आम्रखंड / श्रीखंड / आंब्याचा रस / रसगुल्ला,<br>चपाती / फुलके / पराठा / साधी पुरी / मसाला पुरी, साधी भजी/ मुंग भजी |
| D | **पातळ भाजी :-** पातोडी भाजी / शेव भाजी,<br>**सुकी भाजी :-** भेंडी मसाला / बेंगन मसाला / भरीत,<br>दाल तडका / स्टीम राईस / जिरा राईस /व्हेज पुलाव<br>**गोड पदार्थ :-** मावा जिलेबी / इमारती / खोबरा बर्फी / मोहनथाळ,<br>चपाती / फुलके / पराठा / साधी पुरी / मसाला पुरी / कळणा पुरी / कळणा भाकरी .,साधी भजी/मुंग भजी |
| E | **पातळ भाजी :-** घोटलेली वांग्याची भाजी, मिरचीची भाजी, वरण, भात, बट्टी,<br>**गोडपदर्थ :-** गुळाची जिलेबी / मुंगदाळ हलवा,<br>कोशींबीर, साधी भजी / मुंग भजी, |
| F | पावभाजी, बिरयानी / व्हेज पुलाव,<br>दही कोशींबीर, पापड |
| G | कढी, खिचडी, ठेचा / मिरचीची भाजी,<br>**गोडपदार्थ :-** दिलजानी / मोतीचुर लाडु, |
| H | कढी खिचडी/ ठेचा |
| I | **फुड पॅकेट :-** सुकी भाजी :- बटाटा भाजी/छोले, पुरी/चपाती नग ४,<br>**गोड पदार्थ:-** मोहनथाळ/बर्फी |



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ * जळगाव-४२५००१ *

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ , जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## कुलसचिव कार्यालय

दि. /०१/२०२४

जा.क्र.कबचौ.उमवि/कुलसचिव कार्यालय/निविदा/ /२०२४

### लिफाफा क्र. ०२ प्रपत्र- ८ (व्यापारी लिफाफा) (Price Bid)

**निविदाधारकांचे नाव व पत्ता** ------------------------------------------------------------------------

**विषय :-** चहा, नाश्ता, भोजन दरकरार करणेसाठीच्या निविदेबाबत.

**संदर्भ :-** जा.क्र.कबचौउमवि/२/कुलसचिव कार्यालय/निविदा/ /२०२४ दिं- /०१/२०२४ .

**महोदय,**

खालील दिलेल्या तक्त्याप्रमाणे भोजनाच्या मेनूसाठी प्रत्येक रकाण्यात दर भरावेत.

**नाश्ता साठी मेनु :-**

| | | किती व्यक्तीसाठी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | मेनु | ५१ ते १०० | १०१ ते ३०० | ३०१ ते ७०० | ७०१ ते १२०० | १२०१ ते २००० | २००१ पेक्षा जास्त |
| A | इडली सांबार / मेदुवडा सांबार, | | | | | | |
| B | पोहे / उपमा / भजी, | | | | | | |
| C | आलु पराठा / पराठा व दही, | | | | | | |
| D | दही मिसळ / रस्सा वडा / रस्सा पोहे, | | | | | | |
| E | वडापाव/ कचोरी /समोसा/ पाववडा/ सॅण्डविच | | | | | | |
| F | खमण ढोकला, | | | | | | |
| G | दालपकवान | | | | | | |
| H | साधी भजी/ मुंग भजी | | | | | | |
| I | साबुदाणा खिचडी/ उपवास चिवडा/ वेफर्स, | | | | | | |

विद्यापीठात वर्षभरात आयोजित होणाऱ्या कार्यक्रमांसाठी चहा नाश्ता, व भोजन पुरविण्यासाठी निविदा. (पा.क्र. 1)

भोजनासाठी मेनु:-

| | | किती व्यक्तीसाठी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | मेनू | ५१ ते १०० | १०१ ते ३०० | ३०१ ते ७०० | ७०१ ते १२०० | १२०१ ते २००० | २००१ पेक्षा जास्त |
| A | **पातळ भाजी :-** छोले / मटकी / चवळी, मिक्स व्हेज / पालक पनीर /<br>**सुकी भाजी :-** बटाटा भाजी / मिक्स भाजी<br>दाल फ्राय, जिरा राईस/ स्टीम राईस,<br>**गोड पदार्थ :-** गाजर हलवा/ काजु कतली / अंगुरी रसमलाई / आंब्याचा रस /<br>चपाती / फुलके / पराठा / साधी पुरी / मसाला पुरी<br>साधी भजी / मुंग भजी, | | | | | | |
| B | **पातळ भाजी** :- पनीर मसाला / काजु पनीर / कोफ्ता करी,<br>**सुकी भाजी :-** लसुनी मेथी / मिक्स व्हेज / व्हेज कोल्हापुरी,<br>दाल तडका, जिरा राईस/ स्टीम राईस,<br>**गोड पदार्थ :-** गुलाब जाम / बालुशाही / काला जाम / अंगुरी रसमलाई / दिलजानी,<br>चपाती / फुलके / पराठा / साधी पुरी / मसाला पुरी,<br>साधी भजी / मुंग भजी, | | | | | | |
| C | **सुकी भाजी** :- कोबी बटाटे /भेंडी मसाला / बेंगन मसाला,<br>**पातळ भाजी :-** आलु मटर,/ छोले<br>व्हेज पुलाव / मसाला भात/साधा भात, दाळ<br>**गोड पदार्थ :-** आम्रखंड / श्रीखंड / आंब्याचा रस / रसगुल्ला,<br>चपाती / फुलके / पराठा / साधी पुरी / मसाला पुरी,<br>साधी भजी/ मुंग भजी | | | | | | |
| D | **पातळ भाजी :-** पातोडी भाजी / शेव भाजी,<br>**सुकी भाजी :-** भेंडी मसाला / बेंगन मसाला / भरीत,<br>दाल तडका / स्टीम राईस / जिरा राईस /व्हेज पुलाव<br>**गोड पदार्थ :-** मावा जिलेबी / इमारती / खोबरा बर्फी / मोहनथाळ,<br>चपाती / फुलके / पराठा / साधी पुरी / मसाला पुरी / कळणा पुरी / कळणा भाकरी .,साधी भजी/मुंग भजी | | | | | | |
| E | **पातळ भाजी :-** घोटलेली वांग्याची भाजी, मिरचीची भाजी, वरण, भात, बट्टी,<br>**गोडपदर्थ :-** गुळाची जिलेबी / मुंगदाळ हलवा,<br>कोशींबीर, साधी भजी / मुंग भजी, | | | | | | |
| F | पावभाजी, बिरयानी / व्हेज पुलाव,<br>दही कोशींबीर, पापड | | | | | | |
| G | कढी, खिचडी, ठेचा / मिरचीची भाजी,<br>**गोडपदार्थ :-** दिलजानी / मोतीचुर लाडु, | | | | | | |
| H | कढी खिचडी/ ठेचा | | | | | | |
| I | फुड पॅकेट :- सुकी भाजी :- बटाटा भाजी/छोले,<br>पुरी/चपाती नग ४, गोड पदार्थ:- मोहनथाळ/बर्फी | | | | | | |

(पा.क्र.२)

नगाप्रमाणे पुरविण्याच्या पदार्थांचा तपशील :-

# किती व्यक्तीसाठी

| अ. क्र. | मेनू | ५१ ते १०० | १०१ ते ३०० | ३०१ ते ७०० | ७०१ ते १२०० | १२०१ ते २००० | २००१ पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चहा | | | | | | |
| २ | कॉफी / दुध | | | | | | |
| ३ | केळी | | | | | | |
| ४ | अंडी | | | | | | |
| ५ | आईस्क्रिम Amul/Dinshaw | | | | | | |
| ६ | शरबत | | | | | | |
| ७ | सुप | | | | | | |
| ८ | कैरीचे पन्हे | | | | | | |
| ९ | मठठा / मसाला ताक | | | | | | |
| १० | बिस्कीट | | | | | | |

**टीप** :- १) भोजनाच्या मेनु मध्ये एक सुखीभाजी व एक पातळ भाजी तसेच कोणत्याही प्रकारचे एक गोड पदार्थ राहील. इतर पदार्थ आवश्यकतेनुसार कमी अधिक करण्याच्या अधिकार राखीव आहे.

२) पुरवठादारास दरदिवस सकाळ व रात्रीच्या जेवणासोबत सलाड (कांदा, लिंबु, गाजर, बीट, काकडी, मुळा), लोणचे व पापड (उडीद/नागली/डिस्को पापड) देणे बंधनकारक राहील हे मला मान्य आहे.

३) आर. ओ. व शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

४) संख्या कमी अथवा जास्त असल्यास एक दिवस आधी पुरवठादारास कळविण्यात येईल हे मला मान्य आहे.

**निविदाधारकाची सही** ------------------------------------

**ठिकाण :**

**नांव व पत्ता** ------------------------------------

**दिनांक :**

------------------------------------

विद्यापीठ वर्षभरात आयोजित होणाऱ्या कार्यक्रमासाठी चहा, नाश्ता व भोजन पुरविण्यासाठी निविदा.

पा.क्र. ३

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ * जळगाव-४२५००१ *